# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१**

ईमेलद्वारे

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/गणवेश भत्ता/ २१७४
नागपूर ४४०००१, दिनांक १८-१२-२०१८

प्रति,

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर / पश्चिम मुंबई
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक , कांदळवन कक्ष, मुंबई
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), पुणे
५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
६) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक व्याघ्र प्रकल्प (सर्व)
७) मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना, नागपूर
८) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
९) वन संरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प (सर्व)
१०) वन संरक्षक (वन्यजीव), नाशिक / पुणे
११) वन संरक्षक (संशोधन), पुणे
१२) वन संरक्षक, सामाजिक वनीकरण, (सर्व)
१३) उप वन संरक्षक (सर्व) / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१४) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग (सर्व)

**विषय :** क्षेत्रीय / कार्यालयीन कर्मचारी यांनी गणवेश परिधान करणेबाबत

**संदर्भ :**
१) शासन, महसूल व वनविभाग निर्णय क्र. एफएसटी-०९/१६/प्र.क्र.४१५ /फ-४, दिनांक ०३/११/२०१६
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र कक्ष-४/आस्था/१०/१७-१८/११५३, दिनांक २९/०८/२०१८.

प्रस्तुत प्रकणी मुंबई वन संहिता खंड एक परिच्छेद १३२ मधील तरतूदी व अस्तित्वात असलेल्या शासन आदेशानुसार वन विभागातील क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना शासन खर्चाने गणवेश पुरविला जातो. तसेच शासन निर्णय दिनांक ०३/११/२०१६ अन्वये वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक, वनक्षेत्र सर्व्हेक्षक आणि सर्व्हेक्षक या संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांना गणवेश व त्यासोबतच्या बाबींसाठी वार्षिक रुपये ५१६७/- दराने भत्ता मंजूर करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार वनविभागातील अधिकारी / कर्मचा-यांनी शासकीय गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. अन्यथा ते शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र आहे.

२. वनविभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांचे एकत्रिकरण झाल्याने सामाजिक वनीकरण विभाग आता वनविभागाचाच भाग आहे. त्यामुळे सामाजिक वनीकरण विभागातीलही अधिकारी कर्मचा-यांनी शासकीय गणवेश परिधान करणे आवश्यक आहे. तरी वनविभागातील (सामाजिक वनीकरण शाखेसह) क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांनी शासकीय गणवेश परिधान करणे बंधनकारक असल्याने

जर संबंधित अधिकारी / कर्मचा-यांरी शासकीय गणवेश परिधान करीत नसतील तर त्यांचेवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी. याकरीता सदर अधिकारी व कर्मचा-यांना विहीत मुदतीत गणवेश भत्ता उपलब्ध करुन द्यावा. यासाठी अनुदान आवश्यक असल्यास त्याबाबत मागणी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) यांचेकडे सादर करावी.

वरील सुचना सर्व अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्याव्या व सदर सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

(यु.के. अग्रवाल)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रतिलिपी (ई-मेलद्वारे):-

१) सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर